# डौलदार वळण

डॉ. निशिकान्त श्रोत्री

आज माझ्या साहित्यसंपदेला बऱ्यापैकी आकार लाभून ती वृद्धिंगत झालेली आहे. तथापि मी साााहित्यनिर्मितीला नक्की केव्हा सुरुवात केली याचे उत्तर देणे मात्र कठिण आहे. माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले तेव्हापासून म्हटले तर तो माझ्यातील साहित्यिकावर निश्चितच अन्याय ठरेल, माझी कविता किंवा कथा किंवा लेख प्रथम छापून आल्यापासून म्हटले तरी देखील ते वस्तुस्थितीला धरून होणार नाही. माझे साहित्य अक्षर स्वरूपांत रसिक वाचकांपर्यंत पोहोचण्याच्या किती तरी आधीपासून मी साहित्यनिर्मिती करीतच होतो; किंबहुना प्रत्येक साहित्यिकाच्या आयुष्यात असेच घडत असते. तरीही किती तरी आधी म्हणजे किती याचा शोध घ्यायचा म्हटले तर मी बालपणात - किंबहुना शैशवातच जाऊन पोहोचतो. मॉटेसरीत, म्हणजे आताच्या ज्युनियर केजीत असल्यापासून मी बडबडगीते रचायचो असे माझी मावशी सांगते तर माझ्या माझ्या बालमित्रांच्या आठवणींनुसार लहानपणी गोष्टी सांगतांना मी वाचलेली, ऐकलेली किंवा एखाद्या चित्रपटाची गोष्ट न सांगता नवीनच गोष्ट रचून सांगत असे. त्या काळातील माझे हे 'साहित्य' दर्जेदार होते किंवा नाही या विषयी मी काहीही दावा करू शकत नसलो तरी माझ्यात सर्जनशीलता शैशवावस्थेपासूनच होती यावर मात्र कोणाचेही दुमत नसावे; आणि ते नाहीही. तथापि त्या सर्जनशीलतेला काही विशिष्ट दिशा नव्हती, खास असे काही उद्दिष्ट नव्हते किंवा चौकट नव्हती. जसजशी माझ्या साहित्याला प्रसिद्धी मिळू लागली तसतसे माझ्या आयुष्यात अनेक वाचक आले, बरेचसे साहित्यिक आले, विविध टीकाकार आले. या सर्वांबरोबर कधी प्रत्यक्ष भेटीत, कधी दूरध्वनीवर तर कधी पत्ररूपाने नाझ्या लिखाणाचे कौतुक होऊ लागले तर एखादे वेळी नापसंतीलाही सामोरे जावे लागले. काहीही असले तरी त्यातून वैविध्यपूर्ण विधायक चर्चा होऊ लागल्या आणि त्या चर्चांमधून मला माझ्या लेखनाविषयी सूचना मिळू लागल्या, मार्गदर्शन मिळू लागले.

तसे पाहिले तर माझ्या लिखाणाला बहुरंगी आणि बहुढंगी कंगोरे आहेत. यातील बहुतेक प्रत्येक रंगा-ढंगाला कोणीना कोणी ज्येष्ठ साहित्यिक अथवा टीकाकार किंवा जाणकार वाचक कारणीभूत ठरावेत. या सर्वच कंगोऱ्यांचे गूढ येथे उकलत बसणे हे सांप्रत लेखन मर्यादेच्या आवाक्यापलिकडील आहे. तरी देखील मान्यवर साहित्यिक-समीक्षक व मराठीचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ प्राध्यापक कै. स. शि. भावे यांनी माझ्या साहित्यिक प्रवासाला एका वेगळ्या डौलदार वळणाची ओळख करून दिली ती आज मला मोठ्या कौतुकाने आणि कृतज्ञतेने माझ्या लाडक्या वाचकांना आपुलकीने सांगाविशी वाटते आहे.

निमित्त होते माझ्या पहिल्या काव्यसंग्रहाचे! 'मनाची पिल्लं' हा माझा पहिला काव्यसंग्रह वाचल्यानंतर मुद्दाम मला प्रा. स. शि. भावे यांनी भेटीसाठी पाचारण केले. भेटीत सुरुवातीला त्या काव्यसंग्रहातील काही कवितांचे मनसोक्त कौतुक करून झाल्यावर एकदम ते क्षणभरासाठी स्तब्ध झाले.

'निशिकान्त, तुझी हरकत नसेल तर मला तुझ्या भावी लिखाणाविषयी काही बोलायचे आहे,' सरांच्या तोंडून अखेरीस त्या नीरवतेचा भंग करणारे शब्द बाहेर पडले. अर्थात त्यांना माझ्या अनुमतीची अपेक्षा नाही तर ही बोलण्याची नांदी आहे हे ओळखून निःशब्दपणे अपेक्षित नजरेने मी त्यांच्या नजरेचा वेध घेऊ लागलो. 'तू डॉक्टर आहेस; तुझ्यात सर्जनशीलता आहे, संवेदनाशीलता आहे आणि भाषाप्रभुत्व देखील आहे. या सगळ्यांचा सुंदर मिलाफ घडवून तू तुझ्या वैद्यकीय अनुभवांवर आधारित ललितसाहित्याची निर्मिती करावीस असे माझे तुला आवाहन आहे.'

'सर, मी आहे स्त्रीरोगतज्ज्ञ; माझ्या अनुभवांवर आधारित लिहायचे म्हटले तर त्याला अश्लीलतेचा वास येण्याची शक्यता आहे,' मी माझी प्रमाणिक अडचण प्राजळपणे त्यांच्यासमोर मांडली. 'मला माझे लिखाण कोठेही अश्लीलतेकडे झुकायला नको आहे.'

'तसे होणारच नाही मुळी,' सरांच्या स्वरातून माझ्याविषयी प्रकट होणाऱ्या विश्वासाने मला कृतकृत्य वाटले. 'मी केवळ तुझ्या मनाची पिल्लं मधील कविताच नव्हे तर तुझ्या, कादंबऱ्या, एकांकिका - सारे काही वाचले आहे. तुझे केवळ भाषेवरच प्रभुत्व आहे असे नव्हे तर विषयाची हाताळणी आणि त्याची निवडलेल्या लेखन प्रकारातील मांडणी याबाबतीत तुला सखोल जाण आहे. त्यामुळे वरवर अश्लील वाटणाऱ्या विषयाला देखील तू अश्लीलतेचा स्पर्शदेखील होऊ न देता समर्थपणे मांडू शकशील याविषयी माझ्या मनात तरी काही संदेह नाही.'

या विषयावर त्या भेटीत तरी अधिक काही चर्चा झाली नाही; तथापि भावे सरांचे ते शब्द माझ्या मनात कुठेतरी खोल जाऊन रुतले. अर्थात मी लगेच काही त्याप्रकारचे लिखाण करायला सुरुवात केली असेही नव्हे; पण सरांचे ते आवाहन माझ्या मनत सतत रुंजी घालत असे एवढे मात्र निश्चित.

अन् काही दिवसांनंतर, माझ्या काही सामाजिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्यानंतर अचानक मला कै. भालबा केळकर यांनी माझ्या 'उपद्व्याप' या एकांकिकेसाठी लिहिलेली प्रस्तावना आठवली.

> 'डॉक्टरने लिहिणे व्यवसायासी सुसंगत का नाही वाटत, मला अजून कळत नाही ---- घटनांपासून मानसिक संघर्षापर्यंत, जन्मापासून मृत्यूपर्यंत, लहानापासून थोरापर्यंत, विनोदापासून गांभिर्यापर्यंत श्लीलापासून अश्लीलापर्यंत आणि सुंदरापासून बीभत्सापर्यंत सारं जग - लौकिक आणि खाजगी - डॉक्टरांच्या डोळ्यासमोर येतं, अनुभवाला येतं, जीवनाशी भिडतंही. म्हणूनच खरं नाट्य त्यालाच दिसतं - वास्तव, भावनिक आणि अवास्तवसुद्धा. फक्त पाहिजे आहे ते टिपणारा, कलात्मकतेने विचार करणारा, स्वतःची प्रतीती अत्यंत मोकळेपणानं संयमानं, कल्पकतेनं अविष्कृत करणारा असा डॉक्टर. डॉक्टर श्रोत्री तसे आहेत असं मला जाणवलं. ----'

मी अंतर्मुख झालो. प्रा. स. शि. भावे यांनी मला मार्ग दाखविण्यापूर्वी काही वर्षे भालबांनी हे लिहून ठेवले होते, पण मी त्यावर गांभिर्याने विचार केला नव्हता हेच खरे. आता मात्र त्याकडे दुर्लक्ष करू नये असे प्रकर्षाने वाटू लागले.

वैद्यकीय अनुभवांवर आधारित मी काही कथा लिहिल्या. मात्र या कथा लिहितांना कोठेही वैद्यकीय गोपनीयतेच्या प्रतिज्ञेचा भंग होणार नाही, कथा म्हणजे केस रिपोर्ट ठरणार नाही याची काळजी घेत या कथा लिहिल्या. माझ्या वाचकांना त्या आवडल्या, त्यांच्या पत्रव्यवहारातून त्यांनी मला तसे कळविले देखील. या कथा मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या असल्यामुळे मला मासिकांतून लिखाण करण्यासाठी होणारी मागणी देखील वाढली.

मी मात्र केवळ तेवढ्यावर समाधानी नव्हतो. काही वेगळे, भावे सरांच्या अपेक्षापूर्ती करणारे असे हातून लिहून व्हावे असे वाटत होते.

एव्हाना 'कर्मभूमी', 'सिद्धयोगी', 'कुंचले घेऊन हाती' यांसारख्या कादंबऱ्यांनी मला साहित्यिक क्षेत्रात बऱ्यापैकी यश प्राप्त झाले होते, प्रतिथयश साहित्यिकांत माझी गणना होऊ लागली होती. त्यामुळे मनात खोलवर रुजलेले प्रा. स. शि. भावे यांचे आवाहन अंकूर धरण्यासाठी धडपडू लागले. त्याचे ते प्रयत्न मला अस्वस्थ करू लागले.

अन् मला जाणविले.

जोपर्यत त्या आवाहनाचे रूपांतर मी आव्हानात करीत नाही तोपर्यत हे आपल्या हातून घडणार नाही.

आणि मी ते आव्हान स्वीकारायचे ठरविले.

नेमके त्याच सुमारास माहितीतील कोणातरी दूरच्या व्यक्तीच्या कुटुंबाला – ती व्यक्ती आमच्या नात्यातील होती की नाही तेही मला माहिती नाही – ड्यूशने मायोपाथी नावाच्या विचित्र आजाराने ग्रासल्याचे माझ्या कानावर आले. हा अनुवंशिक आजार ज्या कुटुंबात असतो त्या कुटुंबातील मुली या आजाराच्या वाहक असतात तर मुलगे मात्र लहान वयातच दगावतात.

अगदीच भावनाप्रधान परिस्थिती!

मला कादंबरीसाठी फारच उत्तम वाटला विषय. तथापि समस्या होती ती कादंबरीच्या आवाक्याची. पिढ्यान्‌पिढ्या ग्रासणाऱ्या आजारावर लिहायचे म्हणजे महाभारतासारखे खंडकाव्यच लिहायला हवे. काही तरी वेगळे करायले हवे. भावे सरांनी माझ्यावर दर्शविलेला विश्वास मला प्रेरणा देऊ पहात होता.

अन्‌ माझ्या मनात एक वेगळीच कल्पना तरळली. कोणत्याही कथासूत्रात कोणीतरी नायक, नायिका किंवा खलनायक असतात आणि त्यांच्याभोवती कथानक फिरत असते. मग या कादंबरीत ती भूमिका या वैद्यकीय समस्येलाच का देऊ नये? कथासूत्र मानवी जीवनाशी निगडित असले तरी ते या वैद्यकीय समस्येला केंद्रस्थानी मानून तिच्यावरच गुंफलेले असावे. या कल्पनेने मनात दृढ पाय रोवले आणि त्यातून साकारली माझी वेगळ्या घाटणीची कादंबरी ड्यूशने.

दुर्दैवाने या कादंबरीवर आपले मत सांगायला प्रा. स. शि. भावे त्यावेळी हयात नव्हते.

मात्र या कादंबरीपासून स्फूर्ती घेऊन मी माझ्या इतर कादंबरी लिखाणाबरोबरच या प्रकारच्या वैद्यकीय कादंबऱ्या लिहायला सुरुवात केली. 'हकनाक' ही बेकायदेशीर गर्भपातावरील कादंबरी अशीच खूप गाजली. महाराष्ट्राबाहेरील गोव्यातील नवप्रभामध्ये प्रा. रवींद्र घवी यांनी अतिशय मार्मिकतेने तिचा गौरव केला आहेः

> '----विविध व्यवसायिक साहित्यनिर्मिती करू लागले की मराठी भाषा आणि साहित्य आपोआप समृद्ध होऊ लागेल असे प्रा. माटे यांनी म्हटले होते. डॉ. श्रोत्री यांची 'हकनाक' कादंबरी अशीच समृद्ध आहे.'

या आणि अशा अनेक गौरवशाली शब्दांनी माझा वैद्यकीय कादंबऱ्या लिहिण्याचा उत्साह द्विगुणित होत होता. त्यातूनच महारोगावरील 'शान्तिवन', मानसिक धक्क्यावरील 'सौदामिनी', ब्रेन ट्युमरवरील 'पिसाट', मल्टिपल स्ल्केरॉसिस ऑफ कॉर्ड वर 'शिखंडी', एच्‌आय्‌व्ही वरील 'संरक्षिता' या व इतरही काही अशा प्रकारच्या व घाटणीच्या कादंबऱ्या लिहून झाल्या, रसिक वाचकांनी त्यांना भरभरून प्रतिसाद दिला.

आज सत्तरीचे वेध लागलेले असतांना, भरभरून साहित्य निर्मिती झालेली असतांना या लेखाच्या निमित्ताने मागे वळून पाहतांना मात्र कै. प्रा. स. शि. भावे यांची प्रकर्षाने आठवण येते. त्यांना आवर्जून सांगायचंय, 'सर, तुमच्या आवाहनानुसार लिखाण केले हो, पण त्याचा आस्वाद घ्यायला, त्याचे कौतुक करायला आणि जरूर भासल्यास मला दोन शब्द सुनावायला आज तुमची उणीव जाणविते आहे! स्वर्गातून तरी द्याल का मला आशीर्वाद?'

डॉ. निशिकान्त श्रोत्री
४०/१-अ, कर्वे रस्ता, पुणे – ४११००४
दूरध्वनीः (२०)२५४३३२३३
भ्रमणध्वनीः ९८९०११७७५४
ईमेलः nishikants@gmail.com